# प्रेस नोट

## अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अकोला तर्फे वृत्तपत्र टिपणी

अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अकोला यांनी त्यांच्या आस्थापनेवरील मागासवर्गीयांच्या अनुशेषातील लघुटंकलेखक/कनिष्ठ लिपीक/ शिपाई यांची पदे भरण्याकरीता दिनांक ३० ऑक्टोबर, २०११ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली होती. लघुटंकलेखक व कनिष्ठ लिपीक या पदांच्या लेखी परिक्षेचा निकाल दिनांक १ नोव्हेबर, २०११ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक- २०११ च्या आदर्श आचारसंहितेमुळे लघुटंकलेखक/कनिष्ठ लिपीक/ शिपाई पदे भरण्याची कार्यवाही स्थगीत ठेवण्यात आली होती.

याव्दारे असे कळविण्यात येते की, नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम संपुष्ठात येत असल्याने लघुटंकलेखक /कनिष्ठ लिपीक / शिपाई पदांची भरती प्रक्रिया पुर्ववत करण्यात येत असून भरती प्रक्रियेतील पुढील कार्यक्रम खालील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | कनिष्ठ लिपीक पदाची अंतीम निवड यादी प्रसिध्द करणे | दिनांक १७ डिसेंबर, २०११ पर्यंत |
| २) | शिपाई पदाकरीता घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेचा निकाल जाहीर करणे तसेच शिपाई पदाकरीता मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | |
| ३) | लघुटंकलेखक पदाकरीता घेण्यात आलेल्या लेखी व व्यावसायीक परिक्षेनुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | |
| ४) | लघुटंकलेखक / शिपाई पदाकरीता मुलाखत घेणे | दिनांक २० डिसेबर, २०११ पर्यंत |
| ५) | लघुटंकलेखक / शिपाई पदाची अंतीम निवड यादी प्रसिध्द करणे | दिनांक २२ डिसेंबर, २०११ पर्यंत |

**असे अध्यक्ष जिल्हा निवड समिती व जिल्हाधिकारी अकोला तर्फे कळविण्यांत येत आहे.**

**जिल्हाधिकारी, अकोला**

क्र.कक्ष-१/प्रस/कावि- /२०११
जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला
दिनांक :- डिसेबर, २०११

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

भरती प्रक्रियेबाबतची माहिती जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्रामधून बातमी रुपाने दिनांक १५/१२/२०११ रोजी प्रसिध्द होईल यांची दक्षता घ्यावी.

**जिल्हाधिकारी,अकोला**